

पिंपरी चिंचवड महानगरपालिका ठरली देशात पहिली

e Paper

दैनिक **मेट्रो सिटी वृत्तांत**

वर्ष 4थे

www.metrocityvrutant.in गुरुवार दिनांक 12/06/२०२५ METRO CITY VRUTANT

संपादक : रफी हुसेन ‖ पिंपरी चिंचवड व पुणे ‖ पान 4 ‖ अंक 128 ‖ RNI - MAHMAR /2021/51259 ‖ metrocity924@gmail.com


# पिंपरी-चिंचवड महापालिकेत चार सदस्यीय प्रभाग रचना

## राज्य शासनाचे आदेश

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**पिंपरी-चिंचवड महापालिकेची निवडणूक चार सदस्यीय प्रभाग रचनेनुसार होणार आहे. २०११ च्या जनगणनेच्या लोकसंख्येनुसार प्रभाग रचना करावी, असे आदेश नगरविकास विभागाने दिले आहेत. त्यामुळे शहरात प्रभाग संख्या ३२ राहणार असून, नगरसेवकांची संख्या १२८ राहणार आहे.**




महापालिकेची मुदत २२ मार्च २०२२ रोजी संपली, त्याअगोदर महापालिकेच्या निवडणुकीसाठी प्रभागरचना एक, दोन आणि तीनची होणार यावर चर्चा झाली. अखेर महाविकास आघाडी सरकारने चार सदस्यीय प्रभाग करण्याचा निर्णय घेतला. त्यावर आरक्षण सोडत घेऊन प्रभाग रचनाही जाहीर केली. राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका चार महिन्यांत घेण्याचे आदेश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत. २०११ च्या जनगणनेच्या लोकसंख्येनुसार प्रभागरचना करण्याचा समावेश आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेत समाविष्ट गावांसह २०११ मधील जनगणना १७ लाख २९ हजार ६९२ होती.

त्यानुसार प्रभागाची संख्या ३२ राहणार असून, नगरसेवकांची संख्या १२८ राहणार आहे. प्रभागरचना सुरू करताना सर्वप्रथम उत्तर दिशेकडून सुरुवात करावी. उत्तरेकडून ईशान्य (उत्तर-पूर्व) त्यानंतर पूर्व दिशेकडे येऊन पूर्वेकडून पश्चिमेकडे प्रभागरचना करत सरकावे. शेवट दक्षिणेत करावा. प्रभागांना क्रमांकही त्याच पद्धतीने द्यावेत. प्रभागरचना करताना भौगोलिक सलगता राहील, याची काळजी घ्यावी. प्रभागाच्या सीमारेषा, मोठे रस्ते, नद्या, नाले, डोंगर, रस्ते, फ्लायओव्हर आदी नैसर्गिक मर्यादा विचारात घेऊन निश्चित करावी.

इमारतीचे, चाळीचे, घराचे विभाजन दोन प्रभागांमध्ये होणार नाही, याची दक्षता घ्यावी. मोकळ्या जागांसह सर्व जागा कोणत्या ना कोणत्या प्रभागात आल्याच पाहिजे.

सीमेचे वर्णन करताना रस्ते, नाले, नद्या, सिटी सर्व्हे नंबर यांचे उल्लेख प्रामुख्याने यावयास हवेत. प्रभागातील वस्त्यांचे शक्यतोवर विभाजन होणार नाही, याची दक्षता घ्यावी.कोरोनामुळे जनगणना झाली नाही. त्यामुळे २०११ ची लोकसंख्या गृहित धरली जाणार आहे. त्याचा फटका नगरसेवकांच्या संख्यावाढीला बसणार आहे.

पिंपरी-चिंचवड शहराची २०११ च्या जनगणनेनुसार लोकसंख्या १७ लाख २९ हजार आहे. सध्याची मतदारसंख्या १४ लाख ८८ हजार १२९ आहे.

पण मतदारांची नोंदणी सुरू आहे. त्यामुळे कदाचित ती वाढू शकणार आहे.

**प्रभागरचना ठरवण्याची अशी होणार प्रक्रिया..**

प्रारूप प्रभागरचना तयार करून राज्य निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करावी. त्यानंतर प्रारूप प्रभागरचनेला मान्यता देण्याची जबाबदारी निवडणूक आयोगाने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यावर असेल. प्रारूप प्रभागरचना आयुक्तांनी प्रसिद्ध करावी.

त्यावर प्राप्त हरकती व सूचनांवर सरकारने प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यामार्फत सुनावणी घेण्यात येणार आहे. सुनावणीनंतर अंतिम केलेल्या प्रभागरचनेचा प्रस्ताव निवडणूक आयोगाच्या मान्यतेसाठी सादर करावा लागणार आहे. निवडणूक आयोग प्रभागरचनेला मान्यता देणार आहे.

प्रारूप प्रभागरचनेसाठी आयुक्तांच्या अध्यक्षतेखाली समिती गठित केली जाईल. त्यात स्थानिक स्वराज्य संस्थेच्या क्षेत्राची संपूर्ण माहिती असलेला अधिकारी, प्रभागरचनेशी संबंधित नेमलेला अधिकारी, नगररचनाकार, संगणकतज्ज्ञ, आवश्यकतेनुसार अधिकारी यांचा समावेश असेल.

# पिंपरी चिंचवड महानगरपालिका ठरली देशात पहिली

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

**शहरात पर्यावरणपूरक आणि शाश्वत शहरी विकास प्रकल्प राबविण्यासाठी हरित कर्जरोख्यांच्या माध्यमातून निधी उभारणारी पिंपरी चिंचवड महापालिका ही देशातील पहिली महानगरपालिका ठरली आहे. ही केवळ पिंपरी चिंचवड शहरासाठीच नव्हे तर राज्य सरकारसाठी देखील अभिमानास्पद बाब आहे, असे गौरवद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.**




पिंपरी चिंचवड महापालिकेने पर्यावरणपूरक आणि शाश्वत शहरी विकासाच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल टाकत, हरित कर्ज रोख्यांच्या (ग्रीन बाँड्स) माध्यमातून २०० कोटी रुपयांचा निधी यशस्वीरित्या उभारला आहे. या ऐतिहासिक यशानंतर आज मुंबई शेअर बाजारात (बॉम्बे स्टॉक एक्सचेंज) हरित कर्ज रोख्यांच्या लिस्टिंग निमित्ताने बेल रिंगिंग समारंभ आयोजित करण्यात आला. या समारंभाचे उद्घाटन राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्या प्रमुख उपस्थितीत संपन्न झाले, त्यावेळी ते बोलत होते.

या उद्घाटन प्रसंगी आमदार उमा खापरे, अमित गोरखे, महेश लांडगे, शंकर जगताप, राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक, नगरविकास विभागाचे प्रधान सचिव असीम गुप्ता, डॉ. के. गोविंदराज, बृहन्मुंबई महापालिका आयुक्त भूषण गगरानी, बीएसईचे व्यवस्थापकीय संचालक सुंदररामन राममूर्ती, पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त शेखर सिंह, नवी मुंबई महापालिका आयुक्त कैलास शिंदे, कल्याण डोंबिवली महापालिका आयुक्त अभिनव गोयल, भिवंडी महापालिका आयुक्त अनमोल सागर, उल्हासनगर महापालिका आयुक्त मनीषा आव्हाळे, पनवेल महापालिका आयुक्त मंगेश चितळे, पिंपरी चिंचवड महापालिका अतिरिक्त आयुक्त प्रदीप जांभळे पाटील, तृप्ती सांडभोर, मुख्य लेखा व वित्त अधिकारी तथा संचालक प्रवीण जैन, सह शहर अभियंता बापूसाहेब गायकवाड, उप आयुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता सुनिल पवार, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, ए. के. कॅपिटल प्रा. लि. च्या व्यवस्थापकीय संचालिका अदिती मित्तल यांच्यासह महापालिका व मुंबई शेअर बाजारातील अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, पिंपरी चिंचवड महापालिकेने हरित कर्ज रोखे इश्यू करताच पहिल्या मिनिटातच १०० कोटी रुपयांचा मूळ भाग भरला गेला. ही अभिमानास्पद गोष्ट असून यावरून महाराष्ट्र सरकार व पिंपरी चिंचवड महापालिका यावर गुंतवणूकदारांचा असणारा विश्वास दिसून येतो. पंतप्रधान नरेंद्र मोदी हे स्थानिक स्वराज्य संस्थांनी म्युनिसिपल बाँडद्वारे जास्तीत जास्त निधी उभारावा, यासाठी सातत्याने आग्रही असतात. यामध्ये पिंपरी चिंचवड महापालिकेने आघाडी घेतली आहे. बाँड लिस्टिंग करणे ही खूप क्लिष्ट गोष्ट आहे. यासाठी सहकार्य केलेल्या प्रत्येक संस्थेचे, व्यक्तीचे मी अभिनंदन करतो. तसेच हरित कर्जरोख्यांतून उभारला जाणारा निधी हा पिंपरी चिंचवड महापालिकेद्वारे शहरात हरित सेतूसह विविध पर्यावरणपूरक प्रकल्पांसाठी वापरला जाणार आहे, ही देखील चांगली गोष्ट आहे. कर्जरोख्यांतून निधी उभारण्यात आघाडी घेतल्यामुळे केंद्र सरकारच्या वतीने पिंपरी चिंचवड महापालिकेला २० कोटींचे अनुदान देखील प्राप्त होणार आहे, असेही ते म्हणाले.

आमदार शंकर जगताप म्हणाले, हरित कर्ज रोख्यांच्या माध्यमातून निधी उभारण्याचे काम पिंपरी चिंचवड महापालिकेने केले आहे. याचा फायदा पिंपरी चिंचवड शहरात पर्यावरणपूरक विकास करण्यासाठी होणार आहे. आगामी काळात अशाच पद्धतीने सामाजिक तसेच महापालिकेच्या इतर विकास कामांसाठी कर्ज रोख्यांच्या माध्यमातून निधी उभारता येऊ शकतो का, याहष्टिनेही प्रयत्न करणे गरजेचे आहे. जेणेकरून शहराचा विकास अधिक गतीमान होण्यास मदत होईल. राज्याच्या मुख्य सचिव सुजाता सौनिक म्हणाल्या, पिंपरी चिंचवड महापालिकेने हरित कर्ज रोख्यांद्वारे निधी उभारण्याचे जे पाऊल उचलले आहे, ते कौतुकास्पद आहे. महापालिकेने कर्जरोखे इश्यू करताच त्याला गुंतवणूकदारांनी जो प्रतिसाद दिला, तो पाहता शासकीय संस्थांवरील त्यांचा विश्वास स्पष्ट होतो. शहरीकरण झपाट्याने वाढत असताना पर्यावरणपूरक आणि शाश्वत शहरी विकास साधणे गरजेचे आहे. त्यासाठी हरित कर्ज रोख्याच्या माध्यमातून पिंपरी चिंचवड महापालिकेने निधी उभारण्याचे उत्तम उदाहरण इतरांसमोर ठेवले आहे.

महापालिका आयुक्त शेखर सिंह यांनी या ऐतिहासिक टप्प्यावर आनंद व्यक्त करताना सांगितले, पिंपरी चिंचवड महापालिकेने केलेली ही कामगिरी केवळ आर्थिकदृष्ट्या नव्हे, तर पर्यावरणपूरक व हवामानानुकूल नागरी विकासासाठी एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. गुंतवणूकदारांनी दाखवलेला विश्वास पिंपरी चिंचवडच्या शाश्वत भविष्याची पावती आहे. हा निधी केवळ पायाभूत सुविधा नव्हे तर हरित विकास घडवण्यासाठी वापरण्याचा महापालिकेचा मानस आहे. यावेळी बीएसईचे व्यवस्थापकीय संचालक सुंदररामन राममूर्ती यांनीही पिंपरी चिंचवड महापालिकेचे अभिनंदन करताना बीएसईच्या कामकाजाबाबत माहिती दिली.

**मुख्यमंत्र्यांच्या हस्ते आयुक्तांचा सन्मान**

पिंपरी चिंचवड महापालिकेने 'ग्रीन म्युनिसिपल बाँड लिस्टिंग' केल्याबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पिंपरी चिंचवड महापालिका आयुक्त तथा प्रशासक शेखर सिंह यांचा 'लिस्टिंग सन्मानचिन्ह' देऊन गौरव करण्यात आला. हे सन्मानचिन्ह 'बॉम्बे स्टॉक एक्सचेंज' यांच्या वतीने देण्यात आले

**हरित कर्ज रोख्यांबाबत थोडक्यात...**

पिंपरी चिंचवड महापालिका ही हरित कर्ज रोख्यांद्वारे निधी उभारणारी महाराष्ट्रातील पहिली महापालिका ठरली आहे. महापालिकेच्या या इश्यूला गुंतवणूकदारांकडून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला असून, केवळ एका मिनिटात १०० कोटी रुपयांचा मूळ भाग भरला गेला. एकूण ५१३ कोटी रुपयांच्या निविदा प्राप्त झाल्या, म्हणजेच ५.१३ पट अधिक मागणी नोंदवली गेली. उभारलेला निधी निगडी प्राधिकरणातील हरित सेतू प्रकल्प आणि गवळीमाथा ते इंद्रायणी नगर चौक टेल्को रस्ता विकास प्रकल्पासाठी वापरण्यात येणार आहे. हे दोन्ही प्रकल्प शहराच्या दीर्घकालीन शाश्वत विकास धोरणाचा भाग आहेत. या इश्यूला क्रिसिल आणि केअर या मान्यताप्राप्त पतमापन संस्थांकडून एए+ (AA+) पतमानांकन प्राप्त झाले असून, ७.८५ टक्के स्पर्धात्मक व्याजदर निश्चित करण्यात आला आहे. व्यवहार सल्लागार व मर्चंट बँकर म्हणून ए. के. कॅपिटल प्रायव्हेट लिमिटेड यांनी काम पाहिले. तसेच परतफेडीची हमी सुनिश्चित करण्यासाठी मालमत्ता करातून मिळणाऱ्या उत्पन्नाचे एस्क्रो खाते तयार करण्यात आले आहे..

# सौ.मीना जावळे यांच्या वतीने वटपौर्णिमेनिमित्त महिलांसाठी स्पर्धा संपन्न

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत



आम आदमी पार्टी पिंपरी चिंचवड शहराच्या अध्यक्ष सौ. मीनाताई जावळे व आम आदमी पार्टीच्या सांस्कृतिक विभागाचे शहराध्यक्ष चंद्रमणी जावळे यांच्या वतीने गंगानगर, प्राधिकरण ,आकुर्डी येथे वटपौर्णिमा उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाला ,वटपौर्णिमा निमित्त सौ मीना ताई जावळे यांच्या सह अनेक महिलांनी वादाच्या झाडाचे पूजन केले , या प्रसंगी महिलांसाठी महाराष्ट्रीयन वेशभूषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेमध्ये अनेक महिलांनी सहभाग घेतला, या स्पर्धेत विजेत्या महिलांना साडी व रोख रकमेचे बक्षीस वितरित करण्यात आले, तसेच याप्रसंगी या सहभागी महिलांनी उखाणे घेतले व वटपौर्णिमेचे महत्त्व आपल्या शब्दात स्पष्ट केले ज्या महिलांनी आकर्षक व पारंपारिक पोशाख परिधान केले, तसेच उत्तम उखाणे सादर केले अशा महिलांमधून प्रथम दवूतीय व त्रितिय क्रमांकाचे बक्षीस देण्यात आले. महिलांनी अतिशय उत्साहात स्पर्धेत सहभाग घेत उखाणे सादर केले.

आयोजित या स्पर्धेत प्रथम क्रमांक चैत्राली पवार यांनी मिळविला तर द्वितीय क्रमांक सौ लता विर आणि तृतीय क्रमांकाचे बक्षीस सौ शुभांगी शितोळे यांना देण्यात आले.

# वाहनांना एचएसआरपी बसवून घेण्याचे आवाहन

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पुणेराज्यातील १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या नोंदणीकृत मोटार वाहनांवर उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक पाटी (एचएसआरपी) बसविण्याची निर्देश असून नागरिकांनी वाहनांना एचएसआरपी बसवून घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने एका रिट याचिकेत दिलेल्या निकालानुसार राज्य शासनाने १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या सर्व वाहनांना एचएसआरपी बसविण्याचे निर्देश दिले आहेत. तसेच केंद्रीय मोटार वाहन नियम 1989 च्या नियम 50 नुसार सर्व वाहनांना एचएसआरपी बसविण्याची तरतूद आहे. त्यानुसार परिवहन आयुक्त कार्यालयामार्फत जुन्या वाहनांना एचएसआरपी लावण्याचे कामकाज गतीने सुरू आहे, याकामात अधिक गतीमानता येण्याकरीता विशेष उपाययोजना करण्याकरीता आयुक्तालयाच्यावतीने निर्देश देण्यात आले आहे.

१ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जून्या परिवहन संवर्गातील वाहनांचे योग्यता प्रमाणपत्र नूतनीकरण, परवानाविषयक कामकाज व खाजगी संवर्गातील वाहनांचे नोंदणी




प्रमाणपत्र नूतनीकरण कामकाज वगळून वाहन हस्तांतरण, नोंदणी प्रमाणपत्रामध्ये पत्ता बदल करणे, वित्त बोजा चढविणे किंवा उतरविणे, दुय्यम नोंदणी प्रमाणपत्र देणे, नाहरकत प्रमाणपत्र जारी करणे, वाहनांमध्ये बदल करणे आदी वाहनविषयक सर्व कामकाज एचएसआरपी बसविल्याशिवाय १६ जून २०२५ पासून करण्यात येणार नाही.

तथापि, वाहन मालकांनी एचएसआरपी बसविण्यासाठी पूर्व नियोजित दिनांक व वेळ घेतली असल्यास त्या पावतीची खातरजमा करून त्यांच्या वाहनांचे कामकाज करण्यात येईल.

१६ जून २०२५ पासून एचएसआरपी न बसवलेल्या वाहनांचे कामकाज करण्यात येणार नाही, असे पिंपरी चिंचवडचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी यांनी पत्रकान्वये कळविले आहे.

# उच्चशिक्षित तरुणीची 3 कोटींची फसवणूक

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी – चिंचवड : शादी डॉट कॉम वेबसाईटवरून तरुणीशी संपर्क साधून लग्नाच अमिश दाखवून ३ करोड १६ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक करणाऱ्या तीन आरोपींना पिंपरी- चिंचवडच्या सायबर पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. रणजीत मुन्नालाल यादव, सिकंदर मुन्ना खान आणि बबलू रघुवीर यादव



अशी अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत. अद्याप मुख्य आरोपी फरार आहे. फसवणूक झालेल्या तरुणीकडून ८१ बँक खात्यावर पैसे घेतल्याचे पोलीस तपासात उघड झाल आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, उच्चशिक्षित असलेली तरुणी शादी डॉट कॉम संकेतस्थळावरून विवाहासाठी मुलगा शोधत होती. तेव्हा, अज्ञात आरोपी आणि तिची ओळख झाली. परदेशात नामांकित कंपनीत सीईओ असल्याचं तरुणीला सांगण्यात आलं. फसवणूक झालेल्या उच्चशिक्षित तरुणीचा देखील विश्वास बसला. त्यांचं व्हाट्सअप कॉल वरून दररोज बोलणं सुरू झालं. ते एकमेकांच्या अधिक जवळ आले.

दोघांनी एकमेकांसोबत लग्न करण्याचं ठरवलं होतं. याचा फायदा आरोपीने घेतला.

दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत
गुरुवार दिनांक 12/06/२०२५
पिंपरी चिंचवड | पुणे
e Paper

# मोदी सरकारच्या योजना जनतेपर्यंत पोहोचवा : राजेश पांडे



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड, आगामी महापालिका निवडणुका लक्षात घेता, 'संकल्प ते सिद्धी' अभियानाच्या माध्यमातून केंद्र सरकारच्या विविध विकास योजना आणि गेल्या ११ वर्षातील ४ कोटी लोकांना पक्की घरे, 'हर घर जल' योजना, आयुष्मान भारत योजना यांसारख्या जनहिताच्या योजनांच्या कामगिरीची आणि सरकारच्या विकासकामांची माहिती मतदारांपर्यंत प्रभावीपणे पोहोविणे आवश्यक असून, २०४७ पर्यंत विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी लोकांमध्ये जागरूकता निर्माण करा, असे आवाहन भाजप प्रदेश महामंत्री राजेश पांडे यांनी केले. पिंपरी-चिंचवड शहरात गोविंद गार्डन बँक्वेट हॉल, पिंपळे सौदागर येथे "विकसित भारत संकल्प सभा आणि जिल्हा कार्यशाळा" पार पडली. त्यावेळी पदाधिकाऱ्यांना मार्गदर्शन करतांना ते बोलत होते.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील राष्ट्रीय लोकशाही आघाडी (NDA) सरकारला ११ वर्षे पूर्ण झाल्यानिमित्त भाजपने देशभरात 'संकल्प ते सिद्धी' अभियान सुरू केले आहे. याच अभियानाचा एक महत्त्वाचा भाग म्हणून, कार्यशाळा घेण्यात आली. या कार्यशाळेत जिल्हा प्रभारी वर्षा डहाळे, भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे, आमदार शंकर जगताप, आमदार महेश लांडगे, आमदार अमित गोरखे, माजी आमदार अश्विनीताई जगताप, प्राधिकरणाचे माजी अध्यक्ष सदाशिव खाडे यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी, प्रदेश सदस्य मोरेश्वर शेडगे, माजी महापौर उषा उर्फ माई ढोरे, नितीन काळजे, राहुल जाधव, सरचिटणीस संजय मंगोडेकर, विलास मडेगिरी, अजय पाताडे, शीतल शिंदे, महेश कुलकर्णी, दक्षिण आघाडी प्रदेश अध्यक्ष राजेश पिल्ले, काळूराम बारणे, संतोष कलाटे, माउली थोरात, राजू दुर्गे, महिला मोर्चा अध्यक्ष सुजाता पालांडे, युवा मोर्चा अध्यक्ष राज तापकीर, निता पाडाळे, विकास डोळस, मंडलाध्यक्ष गणेश ढोरे, सोमनाथ तापकीर, सनी बारणे, हर्शल ढोरे, मोहन राऊत, जयदीप खापरे, मंगेश धाडगे, धरम वाघमारे, अनिता वाळूंजकर, शिवराज लांडगे, अमोल डोळस, अजित बुर्डे, रामदास कुटे, योगेश सोनवणे यांच्यासह विधानसभा निवडणूक प्रमुख, नगरसेवक, जिल्हा पदाधिकारी, सर्व मोर्चा / आघाडी / प्रकोष्ठ प्रमुख, मंडल पदाधिकारी, शक्तिकेंद्र प्रमुख आणि इच्छुक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

भाजपा शहराध्यक्ष भाजप शहराध्यक्ष शत्रुघ्न (बापू) काटे यांनी कार्यकर्त्यांना सरकारच्या योजनांचा प्रभावीपणे प्रचार कसा करायचा, याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. ते म्हणाले, 'संकल्प ते सिद्धी' अभियानांतर्गत १० ते १२ जून या काळात जिल्हास्तरावर प्रदर्शने, संवाद सत्रे आणि कार्यशाळा आयोजित केल्या जात आहेत. याव्यतिरिक्त, १६, १७ आणि १८ जून दरम्यान विविध ठिकाणी कार्यक्रम घेण्यात येणार आहेत. ५ जून रोजी 'एक वृक्ष मातृभूमीसाठी' हे विशेष अभियान सुरू करण्यात आले असून, २१ जून रोजी आंतरराष्ट्रीय योग दिनाच्या पार्श्वभूमीवर १७ ते २० जून दरम्यान योग सत्रांची मालिका आयोजित केली जाईल. २५ जून १९७५ रोजी लादण्यात आलेल्या आणीबाणीस स्मरून देशभरात जनजागृती कार्यक्रमही घेतले जाणार असल्याचे त्यांनी सांगितले.

# पिंपरीत 78 लाखांचा अमली पदार्थ जप्त



दैनिक मेट्रो सिटी वृत्तांत

पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या अमली पदार्थविरोधी पथकाने विशेष मोहिमेंतर्गत मे महिन्यात ७२ कारवायांमध्ये १३५ किलो गांजा, ५२१ ग्रॅम अफू, ९५ ग्रॅम एमडी असा एकूण ७८ लाख २ हजार २५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. या गुन्ह्यांमध्ये ८३ आरोपींवर कारवाई करण्यात आली.

पोलीस महासंचालकांच्या आदेशानुसार १ ते ३१ मे या कालावधीत ही विशेष मोहीम राबविण्यात आली.

पोलीस आयुक्त विनयकुमार चौबे यांच्या मार्गदर्शनाखाली २८ विशेष पथकांची स्थापना करण्यात आली होती. या मोहिमेत गुन्हे शाखेने सर्वाधिक ३२ कारवाया करीत ५८ लाखांचा मुद्देमाल जप्त केला. यात बावधन, चाकण, दिघी, पिंपरी, म्हाळुंगे एमआयडीसी पोलीस ठाणे हद्दीत गांजासह एमडी व अफू जप्त करण्यात आले. बावधन पोलिसांनी २१ किलो गांजा जप्त केला. चाकण पोलिसांनी दोन वेगवेगळ्या कारवायांमध्ये ११ व १५ किलो गांजा जप्त केला.

दिघी पोलीस ठाण्याने दोन कारवायांत एकूण १३ किलो गांजा व ११ ग्रॅम एमडी हस्तगत केले.

गुन्हे शाखेच्या युनिट तीनने म्हाळुंगेत २८ किलो गांजाची झाडे पकडली. याशिवाय हिंजवडी पोलिसांनी ६८ ग्रॅम एमडी जप्त करीत दोन आरोपींना अटक केली.

ही विशेष मोहीम पिंपरी-चिंचवड शहरातून अमली पदार्थांचे समूळ उच्चाटन करण्याच्या दिशेने महत्त्वपूर्ण पाऊल असल्याचे पिंपरी-चिंचवड आयुक्तालयाने स्पष्ट केले आहे.

बातमी व जाहिरातीसाठी संपर्क : 8999948968